# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


म्हाडा MHADA

===============================================================================

प्रसिद्धी पत्रक

## सर्वसामान्यांना हक्काचे घर देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प वरळी येथील पुनर्वसन इमारतींच्या बांधकामांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

मुंबई दि. १ ऑगस्ट, २०२१ : - स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, असे म्हणणाऱ्या लोकमान्य टिळकांनी क्रांतीची मशाल पेटवली. आज या स्वराज्यामध्ये सर्वसामान्य जनतेला त्यांचे हक्काचे घर देण्याचे आव्हान आम्ही स्वीकारले असून त्यांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली.

वरळी येथील जांबोरी मैदान येथे आज मुंबईच्या मध्यवर्ती भागात वसलेल्या बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील वरळी येथील पुनर्वसन इमारतींच्या बांधकामाचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते व खासदार शरद पवार, गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड याच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री श्री. ठाकरे बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले, बीडीडी चाळींचा एक मोठा इतिहास आहे. या चाळींनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ पाहिली, महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी हुतात्म्यांचे बलिदान पाहिले. क्रांतिकारी चळवळी तसेच मुंबईच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जडणघडणीत चाळींचा व त्यातील कष्टकऱ्यांचा मोठा वाटा आहे .त्या लोकांचे फार मोठे योगदान मुंबईच्या विकासात राहिले आहे .आपण कितीही मजली इमारती आणि टॉवर्स या ठिकाणी बांधले तरी या चाळींच्या ऋणातून आपण मुक्त होणार नाही.

संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांपैकी अनेकांचे वास्तव्य या मुंबईच्या चाळींमध्ये होते. या हुतात्म्यांची आपण नेहमी आठवण ठेवली पाहिजे. उद्या चाळीतून तुम्ही टॉवरमध्ये जरी गेलात तरी आपली चाळीतील संस्कृती टिकवून ठेवा. संपूर्ण आयुष्य आपण याठिकाणी जगला आहात, हे घर तुमचे स्वतःचे आहे, त्यामुळे कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मुंबईच्या हृदयस्थानी मिळणारे विनामूल्य मिळणारे घर विकू नका, मराठी पाळंमुळांना धक्का लावू देऊ नका, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. जांबोरी मैदानाने क्रांतीच्या मशाली प्रज्वलित केल्या त्या ठिकाणीच आज हा ऐतिहासिक कार्यक्रम होत आहे ही कौतुकास्पद व अविस्मरणीय बाब आहे, असेही मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले. गेल्या काही महिन्यांत सुमारे पाच लाख घरे आपण ग्रामीण भागामध्ये ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून बांधली, गिरणी कामगारांना देखील घर देण्यास सुरुवात केली असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. माझे दोन्ही आजोळ हे चाळीतच राहिले, मी त्यांच्याकडे लहानपणापासून जायचो, त्यामुळे चाळीतले जीवन मला माहिती आहे अशी आठवणही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितली.

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक, वस्त्रोद्योग मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री अस्लम शेख, , पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, गृहनिर्माण राज्यमंत्री सतेज ऊर्फ बंटी डी पाटील, मुंबईच्या महापौर श्रीमती किशोरी पेडणेकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती विनोद घोसाळकर, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे सभापती विजय नाहटा, खासदार अरविंद सावंत, खासदार राहुल शेवाळे, आमदार सदा सरवणकर,आमदार अजय चौधरी, मुख्य सचिव

सीताराम कुंटे, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त इक्बाल सिंग चहल, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर, मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी अरुण डोंगरे, म्हाडाचे मुख्य अभियंता सुनील जाधव, माजी मंत्री सचिन अहिर, माजी आ.सुनील शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

खासदार शरद पवार म्हणाले, बीडीडी चाळींना अतिशय गौरवशाली असा इतिहास आहे .डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,प्रबोधनकार ठाकरे,साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, आचार्य अत्रे अशा कितीतरी महान व्यक्ती व क्रांतिकारकांचे वास्तव्य या चाळींच्या परिसरात होते. महाराष्ट्राच्या ऐक्याचे येथे दर्शन घडते. अनेक जाती- धर्माचे लोक वर्षानुवर्षे एकसंधपणे येथे राहत आहेत. अशा या चाळींचा इतिहास आपण जतन केला पाहिजे. या चाळींमधील रहिवाशांना पुनर्वसनात घरासोबतच अन्य सुविधाही दिल्या पाहिजेत. चाळींच्या जागी टोलेजंग इमारती उभ्या राहतील पण कष्टकरी माणसाला येथून जाऊ देऊ नका. तुमच्या कष्टाचा ठेवा विकू नका तसेच या भागातील मराठी टक्का कमी करू नका, असेही श्री. पवार यांनी सांगितले.

महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले, अनेक विकासाचे प्रकल्प राज्यात सुरू आहेत. ऐतिहासिक अशी शेतकरी कर्जमाफी या शासनाने दिली. समृद्धी महामार्गाचे काम गतीने सुरू आहे. तसेच मुंबईतील कोस्टल रोडसह इतर विकास प्रकल्पांची कामेही वेगाने सुरू आहेत. बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामुळे मानाचा तुरा खोवला जाणार आहे. या प्रकल्पातील भाडेकरू रहिवाशांच्या ज्या मागण्या होत्या, त्या मान्य झाल्या असून या पुनर्विकास प्रकल्पातील अडथळे त्यामुळे दूर झाले आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी असून मुंबईच्या विकासात श्रमिकांचा मोठा वाटा आहे. मुंबई हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे व मुंबईला महाराष्ट्रापासून कोणीही वेगळे करू शकणार नाही. मुंबईचे महत्त्व कमी होणार नाही.

गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड म्हणाले, अनेक क्रांतिकारक, साहित्यिकांसह रामनाथ पारकर यांच्यासारखे क्रिकेटपटूही या बीडीडी चाळीमध्ये वास्तव्याला होते. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम करताना अनेक अडचणी येत होत्या. करारनामा, विस्थापितांचे प्रश्न अशी अशी अनेक आव्हाने होती. परंतु त्यातून मार्ग काढला. पुढील ३६ महिन्यांत हे काम पूर्ण करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. सुमारे तीन हजार पोलिसांना घरे देण्याचे प्रस्तावित असून येथील निवृत्त पोलीस तसेच २०१० पूर्वीपासून ज्यांचे वास्तव्य आहे अशा पोलिसांनाही घरे देण्याचे नियोजन आहे. कामाठीपुरा येथील इमारतींचा समूह पुनर्विकास व कुलाबा येथील झोपडपट्टीचाही पुनर्विकास करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

वस्त्रोद्योग मंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख म्हणाले, मुंबईतील विकास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील असून सर्वसामान्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. मुंबईत कोस्टल रोड, मेट्रो प्रकल्प यांसह अनेक विकास कामे प्रगतीपथावर असून या शासनाचा प्रत्यक्ष कृतीवर भर असून आज होत असलेला बांधकामाचा शुभारंभही ही त्याचाच भाग आहे या प्रकल्पाच्या माध्यमातून सर्वांचे गृहस्वप्न लवकरात लवकर पूर्ण होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पर्यटनमंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री आदित्य ठाकरे म्हणाले, विद्यमान राज्य शासन अस्तित्वात आल्यानंतर प्रलंबित विकासकामांची आम्ही माहिती घेतली. रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आम्ही प्रयत्न सुरू केले आणि आज होत असलेला बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचा शुभारंभ हा त्याचाच भाग आहे. बीडीडी चाळींना एक ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आहे. येथे पुनर्वसनानंतर नवीन इमारती बांधल्या जातील. यातील एका चाळीचे संवर्धन करावे व त्याचे संग्रहालयात रुपांतर करावे . जेणेकरून भावी पिढ्यांना या चाळींचा इतिहास जाणून घेता येईल.येत्या ३६ महिन्यांत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येईल. या प्रकल्पात ९ हजार ६८९ पुनर्वसन सदनिकांची निर्मिती करण्यात येणार आहे. या माध्यमातून केवळ घरेच नाही तर इतर सुविधाही देण्यात येणार आहे.

गृहनिर्माण राज्यमंत्री सतेज उर्फ बंटी डी. पाटील म्हणाले, सर्वसामान्य जनतेला हक्काचे घर देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. गेल्या दीड वर्षात दहा हजार लोकांना लॉटरी पद्धतीने म्हाडाने हक्काचे घर दिले

आहे. पारदर्शकता व विश्वासार्हता ही म्हाडाची ख्याती आहे. बीडीडी पुनर्विकासाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे .या आणि आगामी सर्व प्रकल्पांमध्ये आरोग्य केंद्र आणि इतर सुविधाही देण्याचा शासनाचा विचार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही मोहीम सुरू केली. त्याचप्रमाणे लोकांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी 'माझे कुटुंब माझे घर' अशा पद्धतीचा उपक्रम राबविला जावा, असे सूतोवाच त्यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व मान्यवरांच्या हस्ते "चाळींतले टॉवर" या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. मुंबईच्या उभारणीत मोलाचा वाटा असलेल्या, मुंबई तसेच राज्य आणि देशाच्या सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचा सहभाग असलेल्या अनेक व्यक्ती चाळींमध्ये जन्मल्या, वाढल्या वा मोठ्या झाल्या. काही व्यक्तींच्या इतिहासाचा काही भाग चाळींमध्ये घडला आहे. समाजातील उत्तुंग व्यक्तिमत्त्वांची माहिती, त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या चाळींची माहिती त्यांचा इतिहास या कॉफी टेबल बुकच्या निमित्ताने मांडण्याचा प्रयत्न म्हाडाचा जनसंपर्क विभाग व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे करण्यात आला आहे.

या पुस्तकामध्ये २५ महनीय 'चाळकरी' व्यक्तिमत्त्वांची थोडक्यात माहिती, त्यांची पोर्ट्रेट्स आणि ते ज्या चाळींमध्ये वास्तव्यास होते अशा चाळींची छायाचित्रे आहेत. यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे, थोर जनसाहित्यिक अण्णा भाऊ साठे, लोकनेते श्रीपाद अमृत डांगे, महाराष्ट्रभूषण पु. ल. देशपांडे, ज्येष्ठ साहित्यिक नामदेव ढसाळ, मंगेश पाडगावकर, उद्योगपती धीरूभाई अंबानी अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर यांनी केले तर म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी आभार मानले.

----******----




मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)
बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प वरळी येथील पुनर्वसन इमारती बांधकाम
म्हाडा
PicbyRajeshWaradkar


मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)
बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प वरळी येथील पुनर्वसन इमारती बांधकाम
शुभारंभ
म्हाडा


मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)
बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प वरळी येथील पुनर्वसन इमारती बांधकाम
शुभारंभ


शुभारंभ
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ


मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
MHADA